# बृहन्मुंबई महानगरपालिका

**सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, श.भ.सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१**

क्र.सहा.आ/ए/ १०४४ /ओडी/परिरक्षण, दिनांक: ३० / ०९ /२०२५

## स्थळ दरपत्रिका सूचना

'ए' विभागामधील आझाद मैदान येथे दिनांक ०२.१०.२०२५ रोजी "दसरा मेळावा" कार्यक्रम करण्यात येणार असल्याने तसेच सदर कार्यक्रम मान. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या उपस्थितीत होणार असल्याने दि. २५.०९.२०२५ रोजी आझाद मैदान सभोवतालच्या परिसरात 'ए' विभाग कार्यालयातील संबंधित अधिकारी, पोलीस उप आयुक्त (परि-०१) व कार्यक्रमाच्या आयोजकांसमवेत संयुक्त पाहणी करण्यात आली. त्यानुषंगाने नमूद ठिकाणी नागरिकांची गैरसोय होऊ नये तसेच गर्दीचे व्यवस्थापन करणेकरीता विविध तातडीची कामे प्रस्ताविण्यात आलेली आहेत.

सदर कामे पूर्ण करणे करीता मा. महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त (शहर) व मा. महानगरपालिका आयुक्त यांची अनुक्रमे क्र.अति.आ./शहर/डी/१६२९, दिनांक २९.०९.२०२५ व क्र.एमजीसी/एफ/७९७९, दिनांक २९.०९.२०२५ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. तसेच, त्यानुषंगाने सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग यांनी सदर नियोजित कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता खालील नमूद बाबींची व्यवस्था तातडीने करण्यास या विभागास मौखिक आदेश दिलेले आहेत.

सबब, दिनांक ०२.१०.२०२५ रोजी "दसरा मेळावा" होत असल्याने ए' विभागातील आझाद मैदान सभोवतालच्या परिसरातील खालील नमूद कामांचा अनुभव असलेल्या कंत्राटदांराकडून २४ तासांच्या कालावधीकरीता स्थळदरपत्रिका पात्रता निकषानुसार मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे स्वरुप व ठिकाण | अंदाजित खर्च (वस्तु व सेवा कर सहित) |
|---|---|---|
| १ | आझाद मैदान परिसरामध्ये वैद्यकीय सेवेकरीता मंडपाची उभारणी करणे. | रु. १,८०,०००/- |
| २ | आझाद मैदान येथील महात्मा गांधी रोड लगत प्रस्तावित प्रवेशद्वार ठिकाणची संरक्षक भिंत व लोखंडी ग्रीलचे निष्कासन करुन पुर्नप्रस्थापित करणे. | रु. १,८०,०००/- |
| ३ | आझाद मैदान येथील हजारीमल सोमानी मार्ग पदपथावरील प्रस्तावित प्रवेशद्वार ठिकाणची तसेच क्रॉस मैदान येथील पदपथावरील प्रवेशद्वारावरील लोखंडी ग्रीलचे निष्कासन करुन पुर्नप्रस्थापित करणे | रु. १,२०,०००/- |
| ४ | महात्मा गांधी मार्ग दक्षिण बाजूकडील रस्त्यावर थर्मोप्लास्टिक पेंटच्या सहाय्याने लेन मार्किंग करणे. | रु.२,८०,६०९/- |
| ५ | महात्मा गांधी मार्ग उत्तर बाजूकडील मेट्रो सिनेमा जंक्शन ते चाफेकर बंधू चौक पर्यंत रस्त्यावर थर्मोप्लास्टिक पेंटच्या सहाय्याने लेन मार्किंग करणे. | रु.२,८२,९२७/- |

| | | |
|---|---|---|
| ६ | महात्मा गांधी मार्गावरील चाफेकर बंधू चौकात थर्मोप्लास्टिक पेंटच्या सहाय्याने लेन मार्किंग करणे. | रु.२,८२,८८६/- |
| ७ | महात्मा गांधी मार्गावरील आझाद मैदान सभोवताच्या परिसरात थर्मोप्लास्टिक पेंटच्या सहाय्याने लेन मार्किंग करणे. | रु.२,८३,००९/- |
| ८ | महात्मा गांधी मार्गावरील आझाद मैदान प्रवेशद्वारापसून चाफेकर बंधू चौक पर्यंत रस्त्यावर थर्मोप्लास्टिक पेंटच्या सहाय्याने लेन मार्किंग करणे. | रु.७०,५६९/- |
| ९ | हजारीमल सोमानी मार्ग , महात्मा गांधी मार्ग येथील रस्ते दुभाजक व पदपथ दांडे रंगरंगोटी करीता रंग पुरविणे | रु. १,२०,०००/- |
| १० | आझाद मैदान सभोवतालच्या मार्गीकेवरील रॅम्प दुरुस्ती करणे | रु. ९३,१०६/- |
| ११ | आझाद मैदान येथील असमतल भागाचे मेटल प्लेटच्या सहाय्याने समतलन करणे करीता हायड्रा क्रेन आणि ट्रेलर पुरविणे. | रु.१,५०,०९६/- |
| १२ | आझाद मैदान येथील असमतल भागाचे समतलन करणे करीता जेसीबी, रोड रोलर पुरविणे. | रु.१,०६,२००/- |
| १३ | आकस्मिक स्वरुपाच्या कामाच्या पुर्तते करीता (आझाद मैदानात दलदलीच्या ठिकाणी खडी, रेती इत्यादी सहाय्याने समतलीकरण करणे) | रु.२,९७,३६०/- |
| | **एकूण** | **२४,४६,७६२.००** |

पात्रता व निकष:-

१. बृहन्मुंबई महानगरपालिका नोंदणीकृत कंत्राटदार असणे आवश्यक.
२. समान कामाचा अनुभव असणे आवश्यक.

सबंधित कंत्राटदाराने उपरोक्त पात्रता व निकषाच्या आधारे सहा.आयुक्त 'ए' विभाग यांचे कार्यालय, १३४-ई, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या ठिकाणी स्थळदरपत्रिका भरण्याची कालावधी (दिनांक ३०.०९.२०२५ – सकाळी १२:०० ते दिनांक ०१.१०.२०२५ – सकाळी १०:०० पर्यंत व त्याच दिवशी दिनांक ०१.१०.२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता प्राप्त मोहोरबंद स्थळदरपत्रिका उघडण्यात येतील.)

**सही/-**

**सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग**